# गांधिलमाश्यांच्या संगतीत

ललिता गंडभीर, रिव्हिएरा बीच, फ्लॉरिडा

दीड महिना घर बंद करून आम्ही परगावी गेलों.

परत आलों तर अंगणातल्या दोन सलग दिव्यांवर एक घरटं बांधलेलं दिसलं.

त्यातून भुंग्यांसारखे प्राणी आतबाहेर करत होते. मी शूरपणे जवळ गेले आणि ते निरखून पाहिलं. अर्धगोलाकार, एकमेकावर ओठंगलेल्या, गडद काळ्या, मग कमी काळ्या रंगाचे, पांढऱ्या किनारींचे थर असलेल्या भिंतींचं घर होतं ते. थरांमधल्या फटींच्या दरवाजातून प्राणी आतबाहेर उडत होते.

मी त्या कलात्मक रीतीने बांधलेल्या घरट्याला बघत अजून जवळ गेले तर दोन भुंगे माझ्या चेहऱ्याभोवती प्रदक्षिणा घालून गेले. माझी भीती गेली.

माहितगार लोकांकडून समजलं की ते घरटं, हॉर्नेटस् म्हणजे गांधिलमाश्यांचं मोहोळ होतं. (*चावते तेथे गांध म्हणजे गाठ उठते म्हणून गांधिल/गांधीलमाशी.*)

माझ्या इथूनतिथून गोळा केलेल्या जुजबी माहितीप्रमाणे प्रत्येक घरट्यात अंडीं घालणाऱ्या एक, दोन किंवा तीन-चार राण्या असतात. नर माश्या फक्त उनाडक्या करतात आणि इतर माश्यांच्या मागे लागतात. स्त्रीलिंगी कामकरी माश्या डास, आणि इतर छोटे किडेमकोडे पकडून पिल्लांना, नर माश्यांना आणि राणी माश्यांना खायला देतात. अंड्यांत स्थित्यंतरं (metamorphosis) होत होत त्यांच्या माश्या होतात. थंडी पडली की राण्या मोहोळातून उडून स्वतःला जमिनीत पुरून घेतात. बाकी सगळ्या माश्या मरतात. पुढच्या वर्षी राण्या नवं मोहोळ वसवतात. जर एखाद्या माशीला कोणी इजा केली तर ती संदेश पाठवते. इतर माश्या तिच्या मदतीला येतात. त्या परतपरत चावतात आणि त्यांचा दंश विषारी असतो.

माझ्या दृष्टीने महत्त्वाची माहिती ही, 'गांधिलमाश्या जवळपासच्या माणसांना ओळखतात, त्या त्यांना चावत नाहीत.' मी बिनधास्त आमच्या घरच्या मागच्या डेकवर बसू लागले. कधीमधी गांधिलमाश्या माझ्या चेहऱ्याभवती फिरून जायच्या.

मोहोळाचं काय करायचं याबद्दल माझ्या मनात संदेह नव्हता. तपमान थंड झालं की मोहोळ पाडून टाकायचं. होत होत ते मोहोळ दोन फुटांपेक्षा लांबीरूंदीने मोठं झालं.

माश्यांना गरम होईल म्हणून मी अंगणातला दिवा लावणं बंद केलं. आम्हाला लवकरच परगावी जायचं होतं. मी 'थंडी पडावी' अशी प्रार्थना करू लागले.

थंडी पडली, आमची जायची वेळ आली पण त्या गांधिलमाश्या तिथेच!

पेस्ट कंट्रोलचा (*म्हणजे कीटक नियंत्रण करणारा*) माणूस म्हणाला, "राण्या बहुतेक उडून गेल्या असाव्यात." एवढं मोठ्ठं मोहोळ विजेच्या दिव्यांवर ठेवून जाणं धोक्याचं वाटायला लागलं. झाडावर असतं तर तसंच ठेवून गेलों असतों.

एवढ्या कष्टाने झाडांची साल चावून, त्या चोथ्याचं बांधलेलं, ते सुंदर मोहोळ मोडायचं कसं? त्यातल्या माझ्या शेकडों मित्रमैत्रिणींना मारायचं? माझा नाइलाज झाला, राण्या गेल्या म्हणून मी संमती दिली.

थोड्या वेळाने ते मोहोळ विष टोचून पाडलं गेलं. पेस्ट कंट्रोलचा माणूस म्हणाला, "दोनशे माश्या



घरट्याबाहेर असणार, त्या वाचल्या. त्या आता विखुरतील."

दुसऱ्या दिवशी मी अंगणात उभी होते. अकस्मात् दोन गांधिलमाश्या आल्या, माझ्या चेहऱ्याभवती फिरल्या आणि उडून गेल्या.

ह्या माझ्या मैत्रिणींच्या मोहोळाचा मी सत्यानाश केला होता. माझ्या डोळ्यात पाणी यायला लागलं.

*एकोपा श्रवणांक नव्हेंबर २०२१ मधून.*

*https://www.ekopa.us*

❖❖❖